# संघर्षमय अंक ४

ज्या व्यक्तीचा जन्म कोणत्याही महिन्याच्या ४, १३, २२ व ३१ हया तारखांना झाला असेल , त्यांचा भाग्यांक ४ असून ते ४ या अंकाच्या अधिपत्याखाली येतात. ४ अंकाचा स्वामी ग्रह "हर्षल" आहे.

भाग्यांक ४ च्या जन्मलेल्या व्यक्ती या १ ते ९ अंकामध्ये सर्वात हुषार , बुध्दिमान महत्वाकांक्षी असतात.परंतु हयांना त्यांच्या आयुष्यात यश उशीरा मिळते.संघर्ष करुनच पुढे जातात.

**भाग्यांक ४ च्या लोकांची वैशिष्टये : उत्साह , जोम व प्रगती .**

तुमचे आयुष्य चळवळीचे असुन अनेक अनपेक्षित गोष्टींचा अनुभव येतो.आयुष्यात होणारे बदल सर्व साधारणपणे चांगल्याकरीताच होतात.तुमच्या मनाची पातळी खूप वरच्या दर्जाची असते.जीवनातील रुढी , परंपरा तोडण्याचे सतत प्रयत्न सुरु असतात. तुमचे व्यक्तीमत्व आकर्षक असते.लुच्चेगिरी किंवा खोटेपणा तुम्हाला आवडत नाही. ४ अंक हा १ या अंकाचीच दुसरी बाजू आहे. तुमच्यामध्ये १ या अंकाचे सर्व गुण आहेत. परंतु तुम्ही १ अंकाच्या व्यक्तीइतक्या धीट नसता.जर संधी मिळाली तर मात्र आपले गुण दाखविण्याची क्षमता तुमच्यात असते.स्वतःच्या कल्पनेप्रमाणे नीट, व्यवस्थित व पध्दतशीर आहात.आपले विचार दुसऱ्यावर लादण्याची सवय असते.तर्कशुध्द विचारसरणी ,विश्लेषकता व सुक्ष्म दष्टिकोन ही तुमची वैश्यिष्टये आहेत.सतत विरोध करण्याच्या वृत्तीमुळे गुप्त शत्रु निर्माण होतात व गैरसमज पसरतात.एकलेपणा जाणवतो. बऱ्याच वेळा तुम्ही हातचे राखुन ठेवता.इतरांशी बोलण्यात , वागण्यात तुम्ही कुशलता दाखविता त्यामुळे अपेक्षेपेक्षा जास्त लवकर अडचणीवर मात करता. इतरांपेक्षा जास्त विरोध व जास्त प्रतिकार तुम्ही करता. स्वतःचे विचार व कल्पना ठामपणे मांडून , त्याच गोष्टी कशा बरोबर आहेत असा तुमचा अट्टाहास असतो. सतत कामात मग्न राहणे तुम्हाला आवडते.

परलिंगी व्यकतीपासून फायदा होतो. कौटुंबिक जीवन सुखी असले तरी मित्र किंवा मैत्रिणींची जरुरी भासते. मित्रपरिवार अतिशय छोटा असतो व भांडणाची फिकीर नसते.भावनेची काटकसर दिसते.तुमच्यात दिमाख व प्रतिष्ठा असून कर्तृत्वाला लवकर मान्यता मिळते. आयुष्यातील ४० ते ६० ही वर्षे महत्वाची असून यशाचा सर्वाच्च काळ असतो.

जीवनातील पहिला भाग कष्टदायी असला तरी उर्वरीत भाग यशाचा व महत्वाकांक्षा सफलतेचा असतो. स्वतःच्या अतिआक्रमक स्वभावाला आळा घातल्यास जीवन अधिक सुखदायी होईल.

१ ते ९ अंकापैकी  ४ या अंकाला स्वतःचा अंक वापरता येत नाही. भाग्यांक ४ असलेल्या व्यकतींनी  १, २, ५ ,९ या अंकाचा वापर करावा.तुमच्या आयुष्यात तुमचा अंक वारंवार येतो. जोडीदाराचा अंक ,बद्यंक अकाऊंट ,घर ,फोन क्रमांक ,गाडी  क्रमांक,तारखा व्यक्ती येत राहतात.पण त्यांनी हे अंक प्रकर्षाने टाळले पाहिजेत. कित्येकदा न केलेल्या गुन्हयाबददल दोषी ठरवल जातं.चुकीचे आरोप केले जातात आणि या लोकांबाबत गैरसमज पसरविले जातात. म्हणून ४ अंकाच्या व्यक्तींनी शकयतो वादविवाद टाळावेत.कोर्टाचे खटले , भागीदारी ,जामिन राहणे यांपासून दूर राहवे.

**शुभतारखा : १ , २, ५, ९, १०, ११, १४, १९, २०, २३,२७.**

**शुभरंग : निळा ,जांभळा , पांढरा** .या व्यकतींनी काळा रंग टाळावा.

**४ या अंकाच्या काही प्रसिध्द व्यकती :**

भकती बर्वे इनामदार , सरोजिनी नायडू ,प्रिती झिंटा , उमिद्दला मारतोंडकर , अजितदादा पवार , दिपक मानकर..

आजवर मी ४ अंकाच्या व्यकतीवर खूप काम केले आहे.त्यांच्या नावात बदल करुन दिला आहे.विविध क्षेत्रातल्या लोकांनी आजवर या संधीचा लाभ घेतला आहे.